


# INDIA AND INDIAN OCEAN REGION




Prof. Dr. Chandrakant Banshidhar Bhange

Prof. Dr. Shikha Srivastava

Dr. V M Suneela Shyam

Mr. Devidas Vijay Bhosale

Late Ramrao Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

# India and Indian Ocean Region

Edited By

***Prof. Dr. Chandrakant Bansidhar Bhange***

*Professor and Head*

*Dept. of Military Science, Shri Shivaji College, Parbhani.*

***Prof. Dr. Shikha Srivastava***

*Professor in Dept. of Defence and Strategic Studies, T. D.P.G. College, Jaunpur.*

***Dr. V M Suneela Shyam***

*Assistant Professor in Dept. of Economics Ethiraj College for Womens, Chennai.*

***Mr. Devidas Vijay Bhosale***

*Assistant Professor and Head*

*Dept. of Defence and Strategic Studies, Tuljaram Chaturchand College, Baramati.*

**BIG BOOK DISTRIBUTOR**
bigbookdistributor@gmail.com
B-507, Saya Zions, Greater Noida west
(U.P.- 201305)
8178465057,8700124880

© All rights are reserved. No part of this publication may be reproduced, stored in a retrieval system or transmitted in any form or by any means, electronic, mechanical, photocopying, recording or otherwise, without the prior permission of the copyright holder.

| | | |
|---|---|---|
| **Editor** | : | **Prof. Dr. Chandrakant Bansidar Bhange,**<br>**Prof. Dr. Shikha Srivastava,**<br>**Dr. V.M. Suneela Shyam,**<br>**Mr. Devidas Vijay Bhosle.** |
| **Publisher** | : | **Big Book Distributor**<br>B-507, Saya Zions, Greater Noida west (U.P. -201305) |
| **Phone** | : | +918178465057,8700124880 |
| **E-mail** | : | bigbookdistributor@gmail.com |
| **Book** | : | **India and Indian Ocean Region** |
| **Edition** | : | November 2022 |
| **ISBN** | : | 978-81-959679-1-9 |
| **Price** | : | **₹499** |
| **Printed By** | : | Swaranjali Offset Printers |

Sonpeth Pin-431516

## CONTENTS


**Particulars ............................................................. Page No.**

1. The Challenges and Prospects of India's Neighborhood Policy.........1

2. Indian Ocean: An Analytical Study ..............................................8

3. Ethnic Problem in South Asia Region and India's Role ................12

4. The Challenges and Prospects of India's Neighborhood Policy ......24

5. India's Foreign Policy: From "Look East" To "Act East" ................29

6. Neighbouring of South Asian Nations with Major Issues: An Overview of Indo-Bangladesh Relations ..........................................39

7. Emerging Economic Crisis in Sri-Lanka & Responsibilities of India: An Acid Test for Neighbourhood First Policy ..................................45

8. Why the Fierce Opposition to Agneepath? More Questions Than Answers.........................................................................................51

9. सार्क देशों के साथ भारत का व्यापार:- एक अवलोकन..................................54

10. भारतीय सुरक्षा के सन्दर्भ में हिन्द महासागर का महत्व......................................66

11. भारत-श्रीलंका समसामयिक संबंध ........................................................72

12. भारत हिंद महासागर सामरिक महत्त्व ..........................................................82

13. श्रीलंकेतील सद्यस्थिती आणि भारताचे परराष्ट्र धोरण ......................................88

14. भारताचे परराष्ट्र धोरण आणि शेजारील राष्ट्रांशी आंतरराष्ट्रीय संबंध .......................93

15. भारत श्रीलंका बदलते संबंध..............................................................99

16. भारताची उत्तर भू-सीमा आणि त्याची आव्हाने ...........................................102

17. ब्लू इकॉनॉमी आणि भारत .............................................................118

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

12

# भारत हिंद महासागर सामरिक महत्त्व

प्रा. डॉ.आंधळे बी.व्ही.

सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग

कै.रमेश वरपुडकर महाविद्यालय, सोनपेठ

**प्रस्तावना:**

"जिसका हिंद महासागर पर नियंत्रण है उसका एशिया पर प्रभुत्व है| महासागर सातों समुद्र का आधारभूत है| विश्व की भवितव्यता का निर्णय इसके जल तल पर होगा" |- अल्फ्रेड माहन

भारत हा देश सीमांच्या बाबतीत सुदैवी समजला पाहिजे.कारण भारताच्या बहुतांश सीमा ह्या नैसर्गिक अशा आहेत. भारताच्या उत्तरेला हिमालय पर्वताच्या रांगा आहेत. तर पश्चिम दक्षिण आणि पूर्व दिशांना सागरी संरक्षण लाभले आहे. पश्चिमेस अरबी समुद्र, दक्षिणेस हिंदी महासागर आणि पूर्वेस बंगालचा उपसागर पसरलेला आहे. त्यामुळे भारताच्या नैसर्गिक सीमांमध्ये सागरी सीमांचे विशेष महत्त्व आहे. कारण सागरी सीमा आतापर्यंत सर्वात सुरक्षित मानल्या जात होत्या.परतु विज्ञान तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे त्या असुरक्षित झाल्या आहेत.हिंद महासागरावर ज्या देशाचे सामरिक वर्चस्व राहील तो देश दक्षिण आशियावर सत्ता गाजवेल.विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात जागतिक महासत्तांच्या सत्ता स्पर्धेमध्ये हिंदू महासागराला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.अमेरिका, रशिया,चीन, फ्रान्स ही राष्ट्र हिंद महासागरात आपापले संरक्षण तळ ऊभे करत आहेत.कारण जागतिक तेल व्यापाराच्या वाटा या हिंद महासागरातुन जातात.त्यामुळे हिंद महासागराचे आर्थिक, राजकीय,सामरिक महत्त्व वाढले आहे.

दळणवळणाच्या माध्यमातून हिंद महासागराचे महत्त्व अनन्य साधारण असे आहे. युरोप, पूर्व आफ्रिका, पश्चिम दक्षिण आणि दक्षिण पूर्व आशिया, ऑस्ट्रेलिया यांना जोडणारा हिंद महासागर हा जसा जल वाहतुकीसाठी महत्त्वाचा आहे; तसाच तो हवाई मार्गासाठी सुद्धा महत्त्वाचा आहे. प्रत्येक ११ मिनिटाला हिंद महासागरातून एक जहाज मार्गक्रम करत असते. यामुळेच वर्तमान परिस्थितीत हिंद महासागराकडे संपूर्ण विश्वाचे लक्ष आकर्षित झाले आहे. हिंद महासागरात अमेरिका, रशिया, फ्रान्स, भारत यांच्याबरोबरच चीनने सुद्धा प्रवेश केला आहे. यामुळे एकूणच जगाचे सत्ता संतुलन बदलले आहे. अमेरिका

आणि चीन यांच्यामध्ये हिंद महासागरात नवीन सत्ता स्पर्धा निर्माण झाली आहे.हिंद महासागरावर आपले सामरिक वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी आज ही मोठी राष्ट्रे प्रयत्न करत आहेत.भारताच्या दृष्टीने हिंद महासागर शांतता क्षेत्र राहणे आवश्यक आहे.पण वाढत्या दळणवळणामुळे आणि व्यापारी महत्त्वामुळे मोठी राष्ट्रे हिंद महासागरात आपली नौसैना व बंदरे विकसित करत आहेत.यात विमानवाहू नौका, अण्वस्त्र युक्त पानडुब्या, लष्करी तळ यांचा समावेश आहे.

**हिंद महासागर क्षेत्र:**

हिंद महासागर हा जगातील तिसरा क्रमांकाचा सर्वात मोठा महासागर आहे. पॅसिफिक महासागर, अटलांटिक महासागर आणि हिंद महासागर असा यांचा क्रम आहे. पृथ्वीच्या पृष्ठभागा पैकी सुमारे १४.३५% इतके क्षेत्र या महासागराने व्यापले आहे. त्याचे एकूण क्षेत्रफळ सुमारे ६८.५ दशलक्ष चौरस किलोमीटर एवढे आहे. हिंद महासागराची लांबी १०,४०० किमी.व रुंदी ९,६०० किमी.इतकी आहे.थोडक्यात हिंद महासागराचे क्षेत्रफळ हे जवळपास ७ कोटी,५ लाख,६० हजार चौरस किलोमीटर आहे.हिंद महासागर ऑस्ट्रेलिया, आशिया व आफ्रिका खंडातील राष्ट्रांच्या सीमांना भिडतो.हिंद महासागराच्या किनार्यावर एकुण ४२ लहान मोठी राष्ट्र आहेत.

भारताला जवळपास ७,५१७ किलोमीटर एवढी सागरी सीमा लाभलेली आहे.यात ९ राज्य, चार केंद्र शासित प्रदेश सागरी किनारपट्टी भागात आहेत. यात भारताची मुख्यभूमी अंदमान व निकोबार बेटे तसेच लक्षद्वीप बेटे यांच्या किनारपट्टींचा समावेश होतो. भारताच्या मुख्यभूमीच्या किनारपट्टीची एकूण लांबी ६,१०० किलोमीटर इतकी आहे . 'इंडियन ब्रॅंड इक्विटी फाउंडेशन' च्या माहितीनुसार भारताची १३ मोठी व २०० छोटी बंदरे या महासागराच्या किनार्यावर आहेत. जहाज मंत्रालयाच्या माहितीनुसार भारताच्या एकूण व्यापारापैकी ७०% व्यापार सागरी मार्गाने होतो.यामुळे हिंद महासागराचे सामरिक महत्त्व भारताच्या दृष्टीने अधिक आहे.

**विदेशी शक्तींचा प्रवेश:**

दुसऱ्या महायुद्धापूर्वी हिंदी महासागरावर अधिकांश भागात ब्रिटनचे नियंत्रण होते परंतु दुसऱ्या महायुद्धानंतर हिंदी महासागरात वेगवेगळ्या देशांनी आपला प्रभाव निर्माण करायला सुरुवात केली १९६० च्या दशकानंतर ब्रिटिश नऊशे ना हिंदी महासागरातून पूर्णपणे हटवण्यात आली त्याचीच जागा पुढे फ्रान्स अमेरिका रशिया चीन अधिदेशांनी घेतली आज हिंदी महासागरामध्ये जवळपास १८१ विदेशी युद्ध पोत तैनात आहेत यामध्ये अमेरिका ७७, रशिया ४०, ब्रिटन १८ आणि फ्रान्स ३३ अशी त्यांची संख्या आहे.अमेरिकेचे 'निमित्ज' हे विमान वाहक जहाज हिंद महासागरात आजही गस्त घालत असते.हिंद



Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin 431516 Dist. Parbhani

महासागरातील अमेरिकेचा 'डियागो गार्शिया ' हा महासागरिय संरक्षण अड्डा महत्त्वाचा आहे.यामुळे अमेरिका संपूर्ण आशिया व आफ्रिका खंडावर सामरिक वर्चस्व प्रस्थापित करू शकतो.

अमेरिके बरोबरीच सोव्हिएत रशियाने सुद्धा हिंद महासागरात आपली नौसैनिक गस्त घालायला सुरुवात केली.१९७९ पासून रशियाने २० ते ४० लढाऊ जहाजे हिंद महासागर क्षेत्रात फिरत असत. सोकोतरा द्वीप अदन,होदेदा,सिचेलेस आणि कम्पुचिया हे नाविक अड्डे रशियाने स्थापित केले होते परंतु रशियाच्या विघटनानंतर आज रशियाचा कोणताही सैनिकी अड्डा हिंद महासागरात नाही.

याशिवाय चीन आणि फ्रान्स या देशांचे सुद्धा नाविक सैनिकी अड्डे हिंद महासागरात आहेत. 'पीपल लिबरेशन आर्मी नेव्ही' या तीन स्तरीय सैन्याची रचना असलेल्या चीनचा उद्देश हिंद महासागरात आपले सामरिक वर्चस्व वाढविण्याचा उद्देश आहे. सन २००८-९ मध्ये चीनने हिंद महासागरात चंचुप्रवेश केला.आणि सन २०१७ मध्ये डिजिबोटी,जिवानी,ग्वादर बंदरांवर वर्चस्व प्रस्थापित केले. सध्या चीन पाकिस्तानच्या 'ग्वादर' या बंदरामध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करत आहे. तसेच हम्बनटोटो (श्रीलंका), चितगाव (बांग्लादेश),क्याउक्प्यू (म्यानमार) 'कोको द्वीप' बंदरे विकसित करून भारताची नाकेबंदी करत आहे.यासर्व बंदरांवर अत्याधुनिक सुविधा सामरिक सुविधा विकसित करत आहे. यामुळे एकूणच भारतापुढे हिंद महासागरात चीनचे मोठे आव्हान आहे.

**हिंद महासागर भारतीय दृष्टिकोन:**

हिंद महासागराचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे. कारण अलीकडील काळात औद्योगिक, व्यापार, आर्थिक विकास, भूराजकीय व लष्करी डावपेच्या दृष्टीने हा प्रदेश अत्यंत महत्त्वाचा बनला आहे. केवळ तटीय प्रदेशात नाही तर अफगाणिस्तान, नेपाळ यांच्यासारखे खंडीय देश सुद्धा हिंद महासागराच्या सामरिक राजकारणात रस दाखवत आहेत. शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर जगातील निम्म्यापेक्षा अधिक सशस्त्र संघर्ष, युद्ध या परिसरातच उद्भवली आहेत. यामध्ये सागरी मार्गाने होणाऱ्या दहशतवादी कारवाया, अफगाणिस्तानमधील हस्तक्षेप, इस्लामी दहशतवाद, आफ्रिकन देशांची चाचीगिरी, चीनचा वाढता हस्तक्षेप यामुळे हिंद महासागर चर्चेत राहिला आहे. भारताचे भौगोलिक स्थान हिंद महासागराच्या शिरोभागी आहे. त्यामुळे भारताचे आर्थिक, व्यापारी, राजकीय, लष्करी, सांस्कृतिक व राजनैतिक हितसंबंध हिंद महासागराशी निगडित आहेत. भारताचा मोसमी पाऊस असो अथवा खनिज तेल, नैसर्गिक वायू, मासेमारी व व्यापाराच्या दृष्टीने हिंद महासागर महत्त्वाचा आहे. यामुळे भारताने सेशल्स, मादागास्कर, लक्षद्वीप, मॉरिशस, मालदीव या ठिकाणी आपले नाविक तळ उभारले आहेत.



Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta. Sonpeth Dist Parbhani

भारत आणि हिंद महासागर यांचे अतूट असे नाते आहे.हा एकमेव महासागर आहे की, जो रताच्या नावाने ओळखला जातो. कारण की भारतीय उपमहाद्वीपचा १२.५ % टक्के भूभाग हा हिंद हासागराशी जोडला आहे. भारताचे १,१५६ पेक्षा अधिक द्वीप हिंद महासागरामध्ये आहेत. त्यांच्या रक्षेची आणि विकासाची जबाबदारी ही भारतावर आहे. तसेच भारताचा ९८% आंतरराष्ट्रीय व्यापार हा ंद महासागरामधून होतो.यामध्ये ६३% पेट्रोल, खनिज तेल हे समुद्र मार्गाने भारत विविध देशांकडून ायात करतो. त्यामुळे हिंद महासागराचे सामरिक महत्त्व भारताच्या दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाचे आहे.

सन १९६४ मध्ये अलिप्ततावादी राष्ट्रांच्या शिखर संमेलनात श्रीलंकेने हिंद महासागर हे शांती क्षेत्र ोषित करण्यात यावे असा ठराव मांडला. तसेच १९७० मध्ये महासभेच्या संमेलनात सुद्धा संयुक्त राष्ट्रांत स्ताव तयार करून तो मांडला जावा असे श्रीलंकेने मत मांडले.

संयुक्त राष्ट्र संघाच्या २६ व्या अधिवेशनात भारत, इराण, इराक, केनिया, झांबिया, रंजानिया, बुरुंडी, यमन, युगांडा, श्रीलंका, सोमालिया व यासारख्या तेरा देशांनी हिंद महासागर हे 'शांती क्षेत्र' (Zone of Peace) म्हणून घोषित करण्यात यावे असा ठराव मांडला. त्याला संयुक्त राष्ट्र संघाने सुद्धा मान्यता दिली. १९९३ मध्ये हिंद महासागर शांती क्षेत्र घोषित करण्यासंबंधी संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेने ठराव पारित केला. भारताच्या दृष्टिकोनातून हिंद महासागर हे अण्वस्त्र मुक्त व क्षेपणास्त्र मुक्त क्षेत्र राहिले पाहिजे. कोणत्याही परकीय शक्तींनी हिंद महासागरात येऊन आपले सैनिकी तळ उभे करू नयेत. ज्यामुळे भारताची अखंडता, सार्वभौमत्व व स्वातंत्र्य धोक्यात येईल.

सन १९९७ मध्ये मॉरिशसच्या म्हणण्यानुसार भारताने 'इंडियन ओशन रिम असोसिएशन फॉर रीजनल कॉर्पोरेशन' (Indian Ocean Rim Association for Regional Co-operation-IORARC) या संघटनेची स्थापना करून त्यात हिंद महासागराच्या तटावरील सर्व देशांना एकत्रित करून या संघटनेची स्थापना केली.यात ऑस्ट्रेलिया, मलेशिया, इंडोनेशिया, श्रीलंका, सिंगापूर, ओमान, यमन,तंजानिया, केनिया,मोजाम्बिक,मेडागास्कर,द.आफ्रिका, आणि मॉरिशस यांचा समावेश आहे.पुढे तिच्यामध्ये विस्तार करून थायलंड, संयुक्त अरब अमिराती, सेशल्स, बांगलादेश यांना सुद्धा सामील करून घेतले. 'हिमतक्षेस' या संक्षिप्त नावाने ओळखल्या जाणाऱ्या या सागरिय संघटनेत आज जपान, इराक हे देश सहभागी होऊ इच्छित आहेत.

सन २०१५ मध्ये भारत सरकारने सागर (Security and growth for all region - SAGAR) ही महत्वकांक्षी योजना सुरु केली.या माध्यमातून भारत हिंद महासागरात आर्थिक राजकीय सामरिक प्रस्थापित करू पाहत आहे.याशिवाय प्रोजेक्ट मोसम,सागरमाला हे प्रकल्प भारताकडून



Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Sonpeth Dist.Parbhani

राबविण्यात येत आहेत.तसेच क्वाड (Quadrilateral Security Dialogue -QUAD) समुहाच्या माध्यमातून हिंद प्रशांत महासागराच्या क्षेत्रात चीनच्या वाढत्या वर्चस्वाला शह देण्याचे प्रयत्न सुरू आहेत.यामध्ये अमेरिका, ऑस्ट्रेलिया, जपान आणि भारत या देशांनी हिंद प्रशांत महासागरातील चीनच्या वाढत्या वर्चस्वाला शह देण्याचे धोरण स्वीकारले आहे.QUAD अर्थात चतुर्पक्षीय सुरक्षा संवाद याचा मुख्य उद्देश चीनच्या वाढत्या वर्चस्वाला शह देणे आहे.सन २०१७ पासून पुन्हा हा मंच

**समारोप:**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'लुक ईस्ट एक्ट ईस्ट'(Look East-Act East) या धोरणावर भर देऊन चीनच्या हिंद महासागरातील वर्चस्वाला शह देण्याचा प्रयत्न केला आहे. यासाठी त्यांनी सेशल्स, मॉरिशस, श्रीलंका, मालदीव, माली या हिंद महासागरातील महत्त्वपूर्ण देशांना भेटी देऊन त्यांच्याबरोबर आपले संबंध दृढ करण्यावर भर दिला आहे.यानुसार 4C हे धोरण स्वीकारले आहे.यानुसार संस्कृती Culture, वाणिज्य Commerce, कनेक्टिव्हिटी Connectivity व क्षमता निर्माण Capacity Building यांत वाढ करून आसियान देशांबरोबर संबंध वृद्धिंगत करण्याचा भारताचे धोरण आहे.

तसेच सागरमाला हा प्रकल्प सुरू करून या राष्ट्रांना मदत करण्याचे धोरण स्वीकारले आहे. याशिवाय मलेशिया, इंडोनेशिया, व्हिएतनाम, दक्षिण आफ्रिका, ऑस्ट्रेलिया, जपान यांच्याबरोबर सामरिक साजेदारी वाढवण्याचे प्रयत्न केले पाहिजेत.तसेच येणाऱ्या काळात भारताला हिंद महासागरात आपले प्रभुत्व निर्माण करण्यासाठी सध्याच्या तुलनेत अधिक कार्य करावे लागणार आहे. सध्या हिंद महासागरात भारताची १०३ लढाऊ जहाजे तैनात आहेत.पण चीनच्या 'स्ट्रिंग ऑफ पर्ल्स' धोरणास काटशह देण्यासाठी तटीय देशांना भरिव मदत करणे आवश्यक आहे.चीनने श्रीलंकेला १२ अब्ज डॉलर्सचे कर्ज देऊन दिवाळखोरीत काढले.पण आता भारताने श्रीलंकेला आर्थिक मदत करुन आपलेसे केले पाहिजे.

येणार्या काळात भारताला हिंद महासागरात आपले सामरिक वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी द्वीस्तरिय, त्रिस्तरीय व बहुस्तरिय करार करून विविध राष्ट्रांशी मैत्री करणे आवश्यक आहे.तसेच चीन आज आपल्या एकूण लष्करी खर्चाच्या ४५% खर्च नौदलावर करतो.या तुलनेत भारत केवळ १५% खर्च नौदलावर करतो.यामुळे चीनच्या वाढत्या वर्चस्वाला शह देण्यासाठी आपला लष्करी खर्च वाढवून तो नौदलावर अधिक करणे आवश्यक आहे.याशिवाय हिंद महासागरातील विविध देशांमध्ये भारताने चीनप्रमाणे बंदरे विकसित केली पाहिजेत.भारताला लाभलेली सागरी सीमा सुरक्षित ठेवण्यासाठी नौदलाचे आधुनिकीकरण केले पाहिजे.यासाठी जहाजबांधणी,पानडुबूया, लष्करी तळ, इंटरनेटचे जाळे निर्माण करून देणे आवश्यक आहे.



Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Sonpeth Dist. Parbhani

संदर्भ सूची:


१) साप्ताहिक विवेक २०२० – डॉ .देवळाणकर शैलेंद्र (लेख)
२) सेशेल्स चे सामरिक महत्त्व-ब्रि.महाजन हेमंत
३) हिंद महासागराविषयीचे भारताचे धोरण – डॉ.तोडकर बी.डी.
४) www.wikeapedia.com
५) www.loksatt.com
६) www.drishtiias.com



Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani